


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २५ वा शनिवार दि. २२ फेब्रुवारी २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# वाळू समाधी!टिप्परची वाळू अंगावर रिचवल्याने ५ मजूरांचा झोपेतच मृत्यू!

## पासोडा ते - चांडोळ येथील घटना अवैध रेती उपसा अजून किती जणांचे घेणार बळी महसूल प्रशासन व पोलीस प्रशासन अर्थ पूर्ण झोपेत !

**जनसंचलन/बुलढाणा**

मृत्यू केव्हा ओढावेल हे सांगता येत नाही. आज पहाटे ५ मजुरांना वाळूच्या टिप्परने झोपेतच वाळू समाधी दिल्याची धक्कादायी घटना समोर आली आहे. पासोडा ते चांडोळ रस्त्यावर सुरू असलेल्या एका पुलाजवळ वाळूच्या टिप्पर मुळे ५ मजुरांचा मृत्यू झालाय. टिप्पर चालक मद्यधुंद असावा असा अंदाज व्यक्त होतोय आज पहाटे ४:३० वाजे दरम्यानची ही घटना आहे. मजुरांच्या झोपडीवर वाळूचा टिप्पर खाली केल्याने वाळूखाली दबून मजुरांचा मृत्यू झाला आहे. मृतक मजूर संभाजीनगर आणि जळगाव जिल्ह्यातील आहेत. चांडोळ मार्गावर पासोडी गावातील पुलाचे काम सुरू आहे. या पुलाच्या जवळ तात्पुरती झोपडी करून मजूर राहत आहेत. याच कामासाठी आज सकाळी वाळू घेऊन टिप्पर पोहोचले होते. अंधार असल्यामुळे टिप्पर चालकाने उंच भागावरून ज्या ठिकाणी टिप्पर पोहोचले होते.अंधार असल्यामुळे टिप्पर चालकाने उंच भागावरून ज्या ठिकाणी रेती खाली केली. खाली मजूर झोपले असल्याचे त्याच्या लक्षात आले नव्हते. रेतीच्या प्रचंड ढिगाऱ्याखाली ७ जण अडकले. जेव्हा ही गोष्ट लक्षात आली तेव्हा काही जण मदतीसाठी धावले. केवळ एक महिला आणि एका मुलीला वाचविण्यात गावकऱ्यांना यश आले. परंतु ५ मजूर मरण पावले होते. घटनेची माहिती मिळताच जाफराबाद पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठले. जाफ्राबाद तालुक्यात अवैध रेती उपसा प्रकरणात काही दिवसांपूर्वी एकाचा खून तर दुसऱ्याची आत्महत्या तर आज रेती कारणानेच ५ जणांचा घेतला जीव. जाफ्राबाद तालुक्यात अवैध रेती उपसाचा थैमान: मृत्यूची मालिका सुरूच




जाफ्राबाद तालुक्यात अवैध रेती उपसामुळे पुन्हा एकदा भीषण घटना घडली आहे. काही दिवसांपूर्वी या प्रकरणात एका व्यक्तीचा खून आणि दुसऱ्याची आत्महत्या झाली होती. मात्र, आज या अवैध रेती उपसाच्या विळख्यात आणखी पाच जणांनी आपला जीव गमावला.अवैध रेती उपसामुळे स्थानिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं असून, प्रशासनावर कारवाईसाठी जोरदार दबाव वाढत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे

# समाजमाध्यमावर वादग्रस्त स्टेटस ठेवल्याने इसोलीत तणाव ९ जणांविरोधात गुन्हे दाखल

**जनसंचलन/बुलढाणा**

समाजमाध्यमावर वादग्रस्त स्टेटस ठेवल्याने चिखली तालुक्यातील इसोली येथे दोन समाजांमध्ये तणाव निर्माण झाला. या प्रकरणी दि.२० फेब्रुवारी रोजी तक्रारीवरून पोलिसांनी नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. इसोली येथील शेख आवेश शेख बब्बू याच्या समाजमाध्यमावरील एका अकाऊंटवर वादग्रस्त स्टेटस ठेवण्यात आले होते. हे विशाल शिवदास कोकाटे यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी त्यांच्या तीन सहकाऱ्यांसह शेख आवेश शेख बब्बू यास भेटून स्टेटस काढण्याची विनंती केली. ही घटना २० फेब्रुवारी रोजी रात्री नऊ वाजताच्या सुमारास घडली. दरम्यान, पोस्ट डिलिट करण्याचे मान्य झाल्यानंतर कोकाटे आणि त्यांचे तीन सहकारी घरी जात असताना रात्री त्यांना अडवण्यात आले. तेथे शेख आवेश शेख बब्बू, सादिक पठाण, साहिल खान सादिक खान पठाण, परवेज पटेल रशीद पटेल, शहादत खान रसूल खान पठाण, शेख शकील शेख शफिक, सादिक खान याकूब खान पठाण, शेख समीर शेख शफिक, आणि शेख इरफान शेख फकिरा यांनी त्यांना मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. २० फेब्रुवारी रोजी रात्री वाजता घडली नऊ होती घटना या प्रकारानंतर अपर पोलिस अधीक्षक बी. बी. महामुनी, एसडीपीओ सुधीर पाटील, आणि अमडापूर पोलिस ठाण्याचे ठाणेदार निर्मल यांनी गावात पोहोचून शांतता समितीची बैठक घेतली. यावेळी दोन्ही समाजातील नागरिकांना मतभेद बाजूला ठेवून विकासात्मक दृष्टिकोनातून काम करण्याचे आवाहन करण्यात आले. या सभेला विनोद सिताफळे, समाधान सुपेकर, सुरेश गवई, सुनील शुक्ला आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# विश्वबंधुत्व-विश्वशांतीचे दूत: निरंकारी बाबा....

## संपादकीय लेख

युगदृष्टा निरंकारी बाबा प.पू.हरदेवसिंहजी महाराज हे संत निरंकारी मिशनच्या आध्यात्मिक सद्गुरुपदावर विराजमान होते. तेव्हापासूनच निरंकारी जगतात गुरुपूजा दिवस साजरा होत आहे. दरवर्षी आपला जन्मदिवस २३ फेब्रुवारीला नुसता मौजमस्तीत न घालविता तो जगतकल्याणाच्या कामी यावा, जगातील प्रेरणादायी गुरुवर्यांना या दिवशी वंदन करून त्यांचे सदाचार, सद्विचार आपल्या जीवनात उतरवावे. तीच खरी गुरुपूजा ठरेल. असे बाबाजींना वाटले. याविषयी त्रोटक पण रोचक माहिती श्रीकृष्णदास (बापू) निरंकारीजींच्या अचूक शब्दांतून वेचून घ्यावी... संपादक.

आजच्या विश्वविख्यात आध्यात्मिक संत निरंकारी मिशनने जगाच्या पाठीवर सकारात्मक छाप उमटवली आहे. खरे तर याचे श्रेय जाते ते तत्कालीन युगदृष्टा सद्गुरु निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराज यांना. त्यांनी अखिल मानव जातीत प्रेम भावनेने मानव एकता वाढीस लावली. म्हणून मिशनद्वारे त्यांचा जन्मदिवस गुरुपूजा दिवस निरंकारी जगतात अधिक उत्साहाने विविध लोककल्याणकारी उपक्रमांनी साजरा होऊ लागला. सद्गुरुची महती सांगताना जगद्गुरु तुकारामजी महाराजांनी म्हटले-

सद्गुरु वाचोनि सापडेना सोय।
धरावे ते पाय आधी आधी।

संतशिरोमणी हरदेवसिंहजी महाराजांचा जन्म दिल्ली येथे दि.२३ फेब्रुवारी १९५४ रोजी झाला. त्यांचे वडील बाबा गुरबचनसिंहजी महाराज हे निरंकारी मिशनचे तत्कालीन सद्गुरु होते. बालपणी छोट्या हरदेवांना सर्व आप्तस्वकीय आणि संतमंडळी भोला नावाने प्रेमाने हाक मारत असत.

विश्वात मानव एकता प्रस्थापनेच्या प्रसार कार्यात तत्कालीन सद्गुरु बाबा गुरबचनसिंहजी महाराज हे व्यस्त असतानाच जगतकल्याणार्थ शहीद झाले. त्यानंतर इ.स.१९८० पासून बाबा हरदेवसिंहजी महाराज हे पोरक्या झालेल्या साधसंगतचे- निरंकारी भक्तमंडळींचे सद्गुरु झाले. मिशनचे प्रसार- प्रचार कार्ये अधिक जोमाने सुरू केले. आपले सर्वस्व पणाला लावून बाबाजींनी जगातील कानाकोपर्यात सत्यसंदेश पोहोचवण्यासाठी दिवसरात्र एक करून मिशनचे रथ उत्साहात दामटले. तेव्हापासून मिशनद्वारे २३ फेब्रुवारी हा गुरुपूजा दिवस विविध जनहिताच्या उपक्रम- अभियानांच्या रुपात साजरा करण्यात येऊ लागला. त्यामुळे मिशनच्या कार्यांचा सुगंध सर्वत्र दरवळू लागला. गुरुपूजेच्या परंपरागत पूजाविधीचा सामान गोळा करून गुरूपाद्यपूजा करण्याच्या प्रथेस फाटा देण्यात आला. नवनवीन उपक्रम तथा अभियान हाती घेतले गेले. त्यात प्रामुख्याने रक्तदान, रक्तगट तपासणे, नेत्रदान, अवयवदान, मदत व पुनर्वसन आदी परिस्थितीनुरुप अभियान समाविष्ट केले गेले. यादिवशी शिष्यांनी पूजापाठ मांडून गुरुप्रतिमेसमोर वा गुरुचरणांवर हात जोडून मस्तक टेकवले पाहिजेच असे नाही. तर गुरुदेवाची शिकवण, गुरुवचन आणि मिळालेला गुरुआदेश हे शिरसावंद्य मानून तन, मन, धनाने त्यासाठी स्वतःला झोकून देणे, हीच श्रेष्ठ गुरुपूजा ठरते. आज हेच सत्य समोर आले आहे, कारण तीच काळाची नितांत गरज आहे. बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी सत्यवचन प्रस्तुत केले-

गुरू वचन का पालन करना ही जीवन श्रृंगार हैं।
सद्गुणों को धारण करना ही जीवन श्रृंगार हैं।
सच से जुड़कर सन्तमति को जो जन भी अपनाता हैं।
कहे हरदेव जहाँ भी जाता वह जन शोभा पाता हैं।
पवित्र सम्पूर्ण हरदेव बाणी: पद क्र.१८८

शांतीपूर्ण सह-अस्तित्वाची भावना जागृत करून जगामध्ये विश्वमानव-एकता, विश्वबंधुत्व आणि विश्वशांती अशा एकत्वाने युक्त वातावरण निर्माण करण्यात आपले संपूर्ण जीवन निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी समर्पित केले. दरवर्षी त्यांच्या जन्मदिनी संत निरंकारी मिशनतर्फे विश्वभरातील मिशनच्या लाखो शाखांमध्ये लाखो वृक्ष लावून त्यांचे कमीत कमी तीन वर्षांपर्यंत संरक्षण- संवर्धन करण्याचा प्रण करण्यात येत असतो. भवननिर्माण कार्यात सेवा केली जाते. सेवादार बंधुभगिनी आपत्कालात मदतकार्यात स्वतःला झोकून देतात. हीच निरंकारी संतमंडळींची गुरुपूजा होय. यातून सांप्रत सद्गुरु माऊलीच्या शिकवणीचे तंतोतंत पालन होते. त्यामुळे सद्गुरु माऊली प्रसन्न होते, असा त्यांचा दृढविश्वास आहे. दरवर्षी बाबाजींच्या जयंतीनिमित्त जगभर राबविण्यात येत असलेल्या वृक्षारोपण, वृक्षसंरक्षण व वृक्षसंवर्धन अभियानांतर्गत २१ ते २३ फेब्रुवारी दरम्यान प्रत्येक निरंकारी परिवारातील सदस्याने कमीत कमी एक रोप लावून त्याचे तीन वर्षांपर्यंत संगोपन व संरक्षण करावे. यंदाही अशी प्रेरणा वर्तमान सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराजांनी दिली आहे. इ.स.२००३पासून याच गुरुपूजा दिवसाच्या पावन पर्वावर स्वच्छता अभियानाचीही मोठ्या उत्साहाने सुरुवात झालेली आहे. हे देशव्यापी अभियान तेव्हापासून निरंतर आयोजित करण्यात येत आहेत. कारण हाच मानवाचा धर्म आहे. संत एच.एस.निर्माणजी आंग्लभाषेत म्हणातात-

लव्ह इज दि रिलिजन; हॅट्रेड प्रोफेनिटी.
लव्ह इज नॉर्मेलिटी; हॅट्रेड एन्सेनिटी.
लव्ह इज इस्लेम अँड लव्ह इज ख्रिश्चेनिटी.
गॉड इज दि लव्ह लिव्ह्ज इन हुमेनिटी.
थिंक इट ओव्हर....

वर्तमान निरंकारी सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज आज बाबाजींचे तेच दिव्य संदेश जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवत आहेत. त्यात हीच प्रेरणा देत आहेत, की आपला जीवन तेव्हाच सार्थक होईल; जेव्हा आपण दुसऱ्यांच्या कामी येऊ. संत निरंकारी मिशन अनेक वर्षांपासून संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनच्या माध्यमातून समाज कल्याणाच्या कार्यामध्ये कार्यरत आहे. मिशनच्या माध्यमातून रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण अभियान यांसारखे अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असतात. मागील सन २०२१ व यंदाचे हे वृक्षारोपण अभियान राबवित असताना कोरोनाविषयीचे शासकीय मार्गदर्शक सूचनांचे पालन अवश्यच करण्यात आले आहे. ग्रंथकार अवतारसिंहजी महाराज मानवाला एकत्र येण्यास बजावतात-

ङ्गङ्घमेरे सजनों रल मिल आओ रब दी महिमा गा लईए
सत्गुर तों रब कर के चेते इस ते ध्यान जमा लईए
अवतार गुरु दी चरनीं ढह के अठसठ तीरथ नहा लईए
जिस लई मिलया एह तन चोला ओहो कम्म मुका लईए
(पवित्र सम्पूर्ण अवतार बाणी: पद क्र.७५)

संत निरंकारी मिशनचे आजवरचे आधारवड, दीपस्तंभ तथा बुलंद मजबुती प्रदान करत आलेले सद्गुरु- बाबा बुटासिंहजी महाराज, शहंशाह बाबा अवतारसिंहजी महाराज, युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजी महाराज, युगदृष्टा बाबा हरदेवसिंहजी महाराज, माता सविंदरजी महाराज आणि वर्तमान सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज हे आहेत. गुरुपूजा दिवसाच्या पावन पर्वावर त्यांच्या चरणारविंदावर दासाचे कोटी कोटी प्रणाम! अखिल विश्वाच्या कल्याणाची तळमळ उराशी बाळगून निरंकारी बाबा संतश्रेष्ठ हरदेवसिंहजी महाराज वर्षभर देश-विदेशांची दिव्ययात्रा करीत होते. आज प्रादेशिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय निरंकारी संत समागमातूनही असे अभियान चालविले जाऊ लागले. ही माझ्या निरंकारी बाबाजींची पुण्याई होय. अशाच विदेशी मानवकल्याण यात्रेदरम्यान कॅनडा येथे रस्ता अपघाताचे निमित्त घडून बाबाजींनी नश्वर देहाचा त्याग केला. निरंकारी बाबा युगदृष्टा सद्गुरु हरदेवसिंहजी महाराज दि.१३ मे २०१६ रोजी ब्रह्मलीन झाले. ही बातमी ऐकून संपूर्ण विश्वावर शोककळा पसरली होती, हे येथे उल्लेखनीय! !! साधसंगतजी, चरणस्पर्श धन निरंकारजीं! निरंकारी गुरुपूजा दिवसाच्या सर्व बंधुभगिनींना हार्दिक शुभेच्छा !!

# मेहनत की खामोशीसे.. सफलताने मचाया शोर अंकितच्या यशाने केले अनेकांना प्रेरणांकित!

## पठ्ठा थेट वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक पदी!

**जनसंचलन/बुलढाणा**

सरकारी नोकरी मिळवणे वाटते तितकं सोपं नसतं. परीक्षेसोबत तीव्र स्पर्धेला सामोरं जावं लागतं. एका एका पदासाठी लाखो अर्ज येत असतात.त्यातून योग्य आणि पात्र उमेदवाराची निवड केली जाते.हे मोठे आव्हान बुलढाणा येथील सौ. ज्योती व श्री देवेंद्रसेठ लक्ष्मणलाल कायस्थ यांचे कनिष्ठ सुपुत्र अंकित याने लिलाया पेलले आहे. जिद्द व कष्टाच्या बळावर त्याला वाशिम येथे वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक पद मिळाले आहे. बुलढाणा येथील सौ.ज्योती व श्री देवेंद्रसेठ लक्ष्मणलाल कायस्थ यांचे कनिष्ठ सुपुत्र चि. अंकित कायस्थ यांची सार्वजनिक आरोग्य विभाग (महाराष्ट्र शासन) सरळ सेवा भरती परीक्षेत वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक म्हणून जिल्हा सामान्य रुग्णालय, वाशिम येथे निवड झाली आहे. या परीक्षेची काठिण्यपातळी आणि स्पर्धात्मकता लक्षात घेता, संपूर्ण महाराष्ट्रात फक्त १४ जागा असताना आणि हजारो उमेदवारांनी यात सहभाग घेतला असताना त्याने मिळविलेले यश अजूनही देदीप्यमान ठरते. दत्तगुरूं स्वामींची कृपा व थोरामोठांचे आशीर्वादाने अंकितने हे यश मिळवून संपूर्ण परिवाराचा अभिमान वाढवला आहे,अशी प्रतिक्रिया त्यांच्या आई-वडिलांनी व्यक्त केली आहे.



*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आधी राजकीय दलालीचा आरोप, मग संजय राऊत मराठी साहित्य संमेलनाला कसे?




**वृत्तसंस्था/मुंबई**

राजधानी दिल्ली येथे ९८ व्या मराठी साहित्य संमेलनाला सुरुवात झाली आहे. या निमित्ताने नुकतंच ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. याच पार्श्वभूमीवर बोलताना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी पवारांनी या कार्यक्रमाला जायला नको होतं, असं म्हणताना साहित्य संमेलनावरही गंभीर आरोप केले होते. परंतु खुद्द राऊतांनी साहित्य संमेलनाला उपस्थित लावल्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक झाली आहे. राज ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रवक्ते आणि सचिव योगेश खैरे यांनी एक्स सोशल मीडियावर संजय राऊत यांचा फोटो शेअर करत टीका केली आहे. या फोटोत राऊत काही साहित्यिक मंडळींसोबत बसल्याचे दिसते. फोटो कुठे काढला, याची माहिती नसली, तरी फोटोवरील तपशिलानुसार काल, गुरुवार २० फेब्रुवारी रोजी रात्री ८.३० वाजता फोटो काढल्याचे समजते. हा फोटो शेअर करताना खैरेंनी संजय राऊत यांनी महाराष्ट्राची माफी मागावी, अशी मागणीही केली आहे. दिल्लीतील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन म्हणजे राजकीय दलाली आहे असं म्हणत या संमेलनाचा, साहित्यिकांचा, मराठी भाषेचा अपमान करणारे संजय राऊत इथं काय करत आहेत?? ते जर साहित्य संमेलनात सहभागी होणार असतील तर आधी त्यांनी महाराष्ट्राची माफी मागितली पाहिजे !! असे ट्वीट मनसे प्रवक्ते योगेश खैरे यांनी एक्स सोशल मीडियावर केली आहे.हे मराठी साहित्य संमेलन नसून राजकीय दलाली आहे. कोणालाही कसेही पुरस्कार देत आहेत. कोणाचे कसेही सत्कार करत आहेत. यांचा साहित्याशी संबंध काय? माझा आयोजकांना प्रश्न आहे तुम्ही दिल्लीत दलाली करायला आला आहात का? तुम्ही काय साहित्याची सेवा करताय? भाजपचा हा उपद्व्याप आहे. महाराष्ट्राच्या मानेवर पाय ठेवणाऱ्या लोकांचा सत्कार करतायत त्यांना महाराष्ट्र माफ करणार नाही. हे साहित्य संमेलन नसून दिल्लीतली दलाली आहे असे संजय राऊत म्हणाले होते.

# रमाई घरकुल योजनेचा दुसरा हप्ता द्या नसता ठीया आंदोलन करू - शिवसेना उ.बा.ठा.



**जनसंचलन/ लोणार**

लोणार रमाई घरकुल योजनेचा दुसरा हप्ता त्वरित घ्या नसता नगर परिषदेमध्ये ठिय्या आंदोलन करू असा इशारा शिवसेना उ.बा.ठा. च्या वतीने मुख्याधिकारी नगरपरिषद लोणार यांना देण्यात आला लोणार येथील रमाई घरकुल योजनेअंतर्गत मुख्याधिकारी यांनी विधान सभा निवडणुकीच्या अगोदर घाई घाईने पन्नास हजार रुपयांचा पहिला हप्ता सदरील घरकुलधारकांना दिला त्यानंतर लाभार्थ्यांनी आपले घर पाडले व नव्याने बांधकाम करण्यास सुरुवात केली या घटनेस पाच महिने उलटून गेले तरी अद्याप पुढील हप्ता त्यांना मिळालेला नाही नगरपरिषदेने पहिला हप्ता विधानसभा निवडणुकी अगोदर गडबडीत का होत नाही पण दिला आणि तो दिला म्हणजे प्रशासनाने सर्व कागदपत्रांची पूर्तता, नियम अटी घरांचे सर्वे करूनच व संपूर्ण अभ्यासुनच दिलेले आहे मग दुसरा हप्ता देण्यास काय हरकत आहे सदरील लाभार्थी यांच्या डोक्यावरचे छत हिरावलेले आहे, त्यांचे संसार उघड्यावर आले आहे करिता आपण त्यांचा पुढील हप्ता येत्या पंधरा दिवसाच्या आत देण्यात यावा नसता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तसेच लाभार्थी यांच्यासह नगरपरिषद कार्यालयावर ठिय्या आंदोलन करण्यात येईल याची आपण गांभीर्याने नोंद घ्यावी असा इशारा शिवसेना उबाठाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछीरे तालुकाप्रमुख एड. दीपक मापारी, शहर प्रमुख गजानन जाधव, महिला तालुकाप्रमुख तारामती जायभाये, शहर संघटक कैलास अंभोरे, शहर उपप्रमुख लुकमान कुरेशी, विभागप्रमुख गोपाल मापारी, सुदन अंभोरे, युवा सेना शहर प्रमुख श्रीकांत मादनकर, विनायक मापारी, अमोल सुटे, फहीम खान, ज्ञानेश्वर दूधमोगरे, सचिन सरदार, गुलाब सोनवणे आदींनी दिला

# सगे- सोयऱ्यांचा निर्णय कधीपर्यंत कॅबिनेटमध्ये होणार, मनोज जरांगेंनी थेट सांगितली तारीख...



**वृत्तसंस्था/ परभणी**

मनोज जरांगे पाटील हे आज बीडच्या दौऱ्यावर आहेत. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट जरांगे आज घेणार आहेत. यावेळी त्यांनी परभणीला देखील धावती भेट दिली. संतोष देशमुखांच्या हत्येनंतर जरांगे पाटील हे अनेकदा मस्साजोगला जाताना दिसले. त्यांनी धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार टीका केलीये. काही दिवसांपूर्वीच जरांगे यांनी मोठा खुलासा करत म्हटले की, विधानसभा निवडणुकीच्या वेळी धनंजय मुंडे हे माझ्या भेटीला आले होते आणि त्यावेळी त्यांच्यासोबत वाल्मिक कराड होता. निवडणुकीच्या वेळी अनेक लोक माझ्या भेटीला येत असल्याचेही जरांगे यांनी म्हटले. आता नुकताच जरांगे यांनी मोठा दावा केलाय. सगे- सोयऱ्यांचा निर्णय कधीपर्यंत होणार हे थेट त्यांनी सांगितले. फक्त हेच नाही तर त्यांनी तारीखही सांगून टाकली आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, २५ फेब्रुवारी येत्या मंगळवारपर्यंत देवेंद्र फडणवीस हे सगे- सोयऱ्यांचा निर्णय घेतील. सात करोड मराठा डोळे लावून बसले आहेत. शिंदे समिती त्यांनी सुरू केली. येत्या मंगळवारच्या कॅबिनेटमध्ये निर्णय मंजूर शंभर टक्के होणार आणि आम्ही त्यांच्या स्वागतासाठी तयार असल्याचे जरांगे म्हणाले.यावेळी जरांगे पाटील हे धनंजय मुंडे यांच्यावर टीका करताना देखील दिसले. जरांगे म्हणाले की, पदाला चिटकून बसलेला आहे. लालची माणसांना जनतेचे देणे घेणे नाही किंवा जातीचेही नाही. जनतेने तुम्हाला तिथे बसवले आहे आणि जनता तुमचा राजीनामा मागत असेल तर तुम्ही राजीनामा द्यायला पाहिजे. त्यांना फक्त पैसा आणि पद लागते. लोकांना वेड्यात काढले तर न्याय नाही, मिळणार. ना संतोष देशमुखला ना सोमनाथ सूर्यवंशीला.पोलिसांवर आणि तपास यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना देखील जरांगे पाटील हे दिसले. आरोपींच्या संपत्ती जमा अजूनही केल्या गेल्या नसल्याचे जरांगे यांनी म्हटले. सुप्रिया सुळे यांनी देखील संतोष देशमुखांच्या कुटुंबियांची भेट घेतली. मी संतोष देशमुखांना न्याय मिळून देण्यासाठी लढणार असल्याचे सांगतानाही सुप्रिया सुळे या दिसल्या. संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांनी बीडच्या पोलिसांवर काही गंभीर आरोप केले आहेत

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रोहित शर्मा पहिल्या विजयानंतर कोणाला डिनरला घेऊन जाणार, सामन्यानंतर खरं ते सांगितलंच..

वृत्तसंस्था/ दुबई

भारताच्या चॅम्पियन्स ट्रॉफीतील पहिल्या विजयानंतर रोहित शर्मा संघातील एकाच खेळाडूला स्पेशल डिनरसाठी घेऊन जाणार आहे. भारताचा हा नशिबवान खेळाडू आहे तरी कोण, हे रोहितने सामना संपल्यावर सांगितले आहे. भारतासमोर बांगलादेशने २२९ धावांचे आव्हान ठेवले होते. हे आव्हान माफक वाटत होते. पण हे आव्हान पूर्ण करण्यासाठी भारतीय संघाला तब्बल ४७ षटकांपर्यंत किल्ला लढवावा लागला. कारण खेळपट्टी ही संथ होत चालली होती, त्यामुळे फलंदाजी करणे सोपे नव्हते. त्यामुळे भारताला विजय मिळवण्यासाठी चांगलाच घाम गाळावा लागला. त्यामुळे रोहित शर्मासाठी हा विजय महत्वाचा ठरला.सामना संपल्यावर रोहित शर्मा म्हणाला की, ङ्गङ्घ मला दोन खेळाडूंचे या सामन्यानंतर कौतुक करावेच लागेल. पहिला खेळाडू म्हणजे मोहम्मद शमी. कारण जेव्हा संघाला गरज असते तेव्हा आम्ही त्याच्याकडे जातो. शमी कधीही तयार असतो, तो कोणत्याही परिस्थितीत गोलंदाजी करण्यासाठी नाही म्हणत नाही. या सामन्यातही मोक्याच्या क्षणी तोच संघाच्या मदतीला आला. दुसरा खेळाडू म्हणजे शुभमन गिल. शुभमन गिलकडे काय गुणवत्ता आहे, हे मी कोणालाही सांगायला नको. गिल जोपर्यंत खेळपट्टीवर असतो, तोपर्यंत भारताचा विजय निश्चित असतो. ङ्घयाबाबत रोहित शर्मा म्हणाला की, ङ्गङ्घ अक्षर पटेलच्या गोलंदाजीवर मी झेल सोडला. हा झेल सोपा होता, तो मी पकडायला हवा होता. पण माझ्याकडून तसे झाले नाही. पण या सामन्याच्या विजयानंतर मी अक्षर पटेलला खास डिनरवर घेऊन जाणार आहे. अक्षर पटेलची हॅट्रीक रोहित शर्माने




झेल सोडल्यामुळे हुकली. त्यामुळे त्याचा राग करण्यासाठी रोहित शर्मा त्याला खास डिनरसाठी घेऊन जाणार असल्याचे समजते आहे.भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या पहिल्या सामन्यात विजय साकारला आहे. पण आता त्यांची खरी परीक्षा रविवारी असणार आहे. कारण या सामन्यात भारताचा सामना पाकिस्तानशी होणार आहे. त्यामुळे पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात भारतीय संघ कशी कामगिरी करतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

# मोहम्मद शमीने दुबईत कोणाला दिला फ्लाइंग किस...

वृत्तसंस्था/ दुबई

मोहम्मह शमीने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या पहिल्या सामन्यात इतिहास रचला. पाच विकेट्स घेत शमीने आयसीसीच्या स्पर्धेत सर्वाधिक विकेट्स मिळवण्याचा मानही मिळवला. शमीने पाच विकेट्सनंतर जोरदार सेलिब्रेशन केले आणि एक फ्लाइंग किसही दिला. शमीने दुबईत असताना हा फ्लाइंग नेमका कोणाला दिसला, याची जोरदार चर्चा सुरु झाली होती. या उलट सुलट चर्चांना यावेळी शमीने अखेर पूर्णविराम दिला. सामना संपल्यावर शमीने अखेर आपण कोणाला फ्लाइंग किस दिला, त्या व्यक्तीचे नावही सांगितले आहे. मोहम्मद शमीने सामन्यानंतर सांगितले की, वनडे वर्ल्ड कपमध्ये माझ्याकडून चांगली कामगिरी झाली होती. पण त्यानंतर मला दुखापत झाली आणि शस्त्रक्रीया करावी लागली. त्यावेळी माझा डॉक्टरांना पहिलाच प्रश्न होता की, मी मैदानात पुन्हा कधी परतणार. कारण मला त्यावेळी पायही जमिनीवर ठेवता येत नव्हते. पण मी हार मानली नाही. कारण मला भारतासाठी क्रिकेट खेळायचे होते. आयसीसीच्या स्पर्धेत पुन्हा मला खेळायला मिळाले, हे मी माझे भाग्य समजतो. मोहम्मद शमी म्हणाला की, जेव्हा माझ्या नावावर विक्रम झाला, तेव्हा मला या गोष्टीची कल्पनाच नव्हती. मी देशासाठी मैदानात कशी कामगिरी करू शकतो, हेच माझ्या डोक्यात असते. पण पाच विकेट्स मिळाल्यावर मी सेलिब्रेशन केले आणि एक फ्लाइंग किसही दिला. हा फ्लाइंग किस मी माझ्या वडिलांना दिला. कारण ते माझे आदर्श आहेत. मेहनत माझी असली तरी आशिर्वाद त्यांचे आहेत. त्यामुळे त्यांच्यासाठी मी ही फ्लाइंग किस दिली होती. मोहम्मद शमीने पहिल्याच षटकात भारताला यश मिळवून दिले. त्यानंतर जेव्हा जेव्हा भारताचा संघ अडचणीत आला होता, तेव्हा तेव्हा मोहम्मद शमी भारताला विकेट्स मिळवून देत होता. त्यामुळेच सामना संपल्यावर रोहित शर्मानेही शमीचे कौतुक केले. रोहित म्हणाला की, मोहम्मद शमी हा असा गोलंदाज आहे की, तो कधीही तयार असो. परिस्थिती कशीही असली तरी शमी नेहमीच संघाच्या मदतीला धावून आला आहे. पहिल्याच सामन्यात त्याने आपली उपयुक्तता दाखवून दिली आहे. त्यामुळे शमीसारखा गोलंदाज मिळाला, हे आमचे भाग्य आहे. कारण तो संघासाठी नेहमीच धावून येतो.

# भारताच्या सामन्यापूर्वी पाकिस्तानच्या संघावर आयसीसीची कारवाई, समोर आलं आता नवीन प्रकरण...

वृत्तसंस्था/ दुबई

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना आता फक्त काही तासांवर येऊन ठेपला आहे. पण या सामन्याला सुरुवात होण्यापूर्वी आता आयसीसीने पाकिस्तानवर कडक कारवाई केल्याचे आता समोर आले आहे.भारत आणि पाकिस्तान यांचे चॅम्पियन्य ट्रॉफीमध्ये प्रत्येकी एक सामना झाला आहे. पाकिस्तानला पहिल्या सामन्यात न्यूझीलंडकडून मानहानीकारक पराभव पत्करावा लागला आहे. पण भारताने पहिल्या सामन्यात विजय साकारला. भारताने पहिल्या सामन्यात बांगलादेशवर मात करत आपले गुणांचे खाते उघडले आहे. त्यामुळे पाकिस्तानसाठी आता करो या मरो, असाच सामना भारताविरुद्ध खेळावा लागणार आहे. कारण भारताविरुद्धच्या सामन्यात जर पाकिस्तानचा पराभव झाला तर त्यांचे आव्हान संपुष्टात येऊ शकते.भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना हा रविवारी खेळवण्यात येणार आहे. पण आता शुक्रवारीच पाकिस्तानच्या संघाला मोठा धक्का बसला आहे. कारण आयसीसीने आता पाकिस्तानच्या संघावर कडक कारवाई केली आहे. पाकिस्तानचा पहिला सामना न्यूझीलंडबरोबर झाला. त्यावेळी पाकिस्तानचा पराभव तर झालाच, पण त्यानंतर आता अजून एक मोठा धक्का पाकिस्तानला बसला आहे. कारण या सामन्यात पाकिस्तानने संथ गतीने गोलंदाजी केली होती आणि त्याचा फटका आता त्यांना बसला आहे. कारण आयसीसीने कडक कारवाई करताना पाकिस्तानच्या संघातील सर्व खेळाडूंना मानधनाच्या पाच टक्के रक्कम दंड स्वरुपात कापण्यात येणार आहे. त्याचबरोबर पाकिस्तानचा कर्णधार मोहम्मद रिझवानला ताकिद देण्यात आली आहे. त्यामुळे आता भारताविरुद्धच्या



सामन्यात जर पुन्हा एकदा पाकिस्तानं संथ गतीने गोलंदाजी केली, तर आयसीसीच्या त्यांच्यावर कडक कारवाई करणार असल्याचे आता समोर आले आहे. त्यामुळे भारताविरुद्धच्या सर्वात दडपणाखालील सामन्यात आता पाकिस्तानला षटकांच्या गतीचे जास्त दडपण असणार आहे. त्यामुळे पाकिस्तानचा कर्णधार आता या सामन्यात गोलंदाजांचा वापर कसा करतो, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यावर तमाम क्रिकेट विश्वाचे लक्ष असणार आहे. पण यावेळी पाकिस्तानवर सर्वात जास्त दडपण असणार आहे. कारण पहिली गोष्ट म्हणजे त्यांनी पहिला सामना गमावला आहे. दुसरी गोष्ट म्हणजे पाकिस्तानला आता षटकांची गती योग्य ठेवावी लागणार आहे. त्यामुळे भारतापेक्षा पाकिस्तानच्या संघावर जास्त दडपण असणार आहे. दुसरीकडे भारताने पहिला सामना सहज जिंकला होता, त्यामुळे त्यांच्यावर जास्त दडपण नसेल. रविवारच्या सामन्यासाठी भारताचे पारडे हे पाकिस्तानपेक्षा नक्की जड असल्याचे समोर आले आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बॉलिवूडमध्ये बदलतोय ट्रेंड, स्टारकिड्सच्या लाँचसाठी आता पार्ट्या नव्हे तर हा आहे खास फंडा...

**जनसंचलन/ मुंबई**

पूर्वी सुपरस्टार्स त्यांच्या मुलांना मोठ्या पडद्यावर आणायचे, तेव्हा भव्यदिव्य सोहळेच व्हायचे. आता मात्र असं चित्र फारसं दिसून येत नाही. आता स्टारकिड्सच्या येण्याचं प्रमाण वाढलं असलं तरी त्यांच्या पदार्पणाची पद्धत बदलली आहे. हल्ली सुपरस्टार्सच्या बॉलिवूडमधलं मुलांचं पहिलं पाऊल सिनेमागृहांऐवजी आधी ओटीटीकडे वळताना दिसतंय. आमिर खानच्या मुलानं जुनैद खान यानं महाराज, शाहरुख खानची मुलगी सुहाना खान हिनं द आर्चिज, तर आता सैफ अली खानचा मुलगा इब्राहिम अली खान यानं नादानियां अशा कलाकृतींमधून पदार्पण केलंय. एवढंच नाही, तर आर्यन खानही द बॅड्स ऑफ बॉलिवूड या वेब सीरिजद्वारे दिग्दर्शक म्हणून ओटीटीवर येणार आहे. सुपरस्टार्सची मुलं थेट सिनेमागृहात झळकण्याऐवजी ओटीटीवर पदार्पण करत आहेत.धर्मेंद्र यांनी बॉबी देओलला बरसात चित्रपटातून लाँच केलं, तेव्हा त्यासाठी भव्य पार्टी आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी बॉबीसह राजेश खन्ना यांची मुलगी ट्विंकल खन्नाही त्या चित्रपटातून पदार्पण करत होती. अशाच प्रकारे अभिषेक बच्चन आणि करीना कपूर यांच्यासाठीही जोरदार प्रमोशन करण्यात आलं होतं. मात्र, आता परिस्थिती बदलली आहे. शाहरुख खान, आमिर खान, सैफ अली खान यांच्या मुलांनी तर अमिताभ बच्चन यांच्या नातवानं ओटीटीविश्वात पहिलं पाऊल टाकलंय.तज्ज्ञांच्या मते, सिनेमागृहात प्रेक्षक खेचून आणणं ही मोठी जबाबदारी आहे. याविषयी निर्माते आणि ट्रेड ॲनालिस्ट गिरीश जौहर म्हणाले, स्टारकिड्सचं ओटीटीवर पदार्पण होणं हा सध्याचा सुरक्षित पर्याय आहे. ओटीटीच्या प्रेक्षकांची प्रतिक्रिया पटकन समजते. त्यामुळे निर्माते आधी ओटीटीवर या मुलांची क्षमता आजमावत आहेत आणि नंतर मोठ्या पडद्यावर त्यांना संधी देत आहेत. गिरीश यांच्या मते ही पद्धत यशस्वी ठरली आहे. जुनैद खान आणि खुशी कपूर यांनी लव्हयाप्पा या सिनेमातून मोठ्या पडद्यावर आगमन केलं. अमिताभ बच्चन यांचा नातू अगस्त्य नंदा इक्कीस या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर दिसणार आहे. सुहाना खानही शाहरुख खानसोबत किंग या सिनेमात दिसणार आहे. इब्राहिम अली खान नादानियां नंतर करण जोहरच्या सरजमीन या सिनेमात दिसणार आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेते समीक्षक दीपक दुआ म्हणाले, निर्माते स्टारकिड्सना सिनेमागृहात लाँच करण्यास धजावत नाहीत. गेल्या काही वर्षांत थेट मोठ्या पडद्यावर पदार्पण केलेल्या स्टारकिड्सचं काय झालं? सनी देओलचा मुलगा राजवीर देओल, जावेद जाफरीचा मुलगा



मीजान जाफरी, वरुण धवनची चुलत बहीण अंजिनी धवन, रोशन पारिवारातील पश्मीना रोशन, रवीना टंडनची मुलगी राशा थडानी आणि अजय देवगणचा भाचा अमन देवगण हे सर्व मोठ्या पडद्यावर अपेक्षित यश मिळवू शकले नाहीत.पूर्वी बरेच स्टारकिड्स आपल्या घरच्या निर्मिती संस्थेपासूनच सुरुवात करायचे. संजय दत्तला त्यांच्या वडिलांनी, कुमार गौरव यांना राजेंद्र कुमार यांनी, तर ऋतिक रोशनला राकेश रोशन यांनी भव्य चित्रपटातून लाँच केलं. मात्र, आता हा ट्रेंड दिसत नाही. राजेश रोशन यांची मुलगी पश्मीना रोशन म्हणाली, माझं कुटुंब मला लॉन्च करण्यासाठी खास चित्रपट बनवेल, असा विचारही मी करत नाही. मला स्वतःच्या मेहनतीवर करिअर घडवायचं आहे. वरुण धवनची चुलत बहीण अंजिनी धवन म्हणाली, डेविड धवन हे माझे आजोबा आहेत. पण आमच्या घरच्या निर्मिती संस्थेच्या माध्यमातून माझ्या अभिनयप्रवासाची सुरुवात होईल अशी मी कधी अपेक्षाच ठेवली नाही. मेहनतीनं स्वतःचं करिअर घडवायचं असंच आम्हाला शिकवलं गेलंय. सिनेमागृह आणि ओटीटी यातील रेषा आता पुसट झाल्या आहेत. ओटीटीवर पदार्पण केल्यानं नव्या कलाकारांचा सराव होतो. त्यामुळे निर्माते आधी ओटीटीवर स्टारकिड्सची चाचणी घेतात आणि नंतर त्यांना मोठ्या पडद्यावर संधी देतात.

# मुघलांना वाट दाखवल्याचा पुरावा द्या, गणोजी शिर्केंच्या वंशजांचा आक्षेप...

## राज्यभर आंदोलनाचा दिला इशारा...

**जनसंचलन/ पुणे**

दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांचा छावा चित्रपट सध्या देशभर गाजतोय. या सिनेमातील कथानकावर आता शिर्के घराण्याकडून आक्षेप घेण्यात आला आहे. छत्रपती संभाजी महाराज यांना पकडण्यासाठी गणोजी आणि कान्होजी शिर्के यांनी मुघलांना मदत केली,त्यांनी स्वराज्याशी गद्दारी केल्याचं सिनेमात दाखवण्यात आलं आहे. यावर आता शिर्के घराण्यातील वंशजांकडून आक्षेप घेतला जातोय. गणोजी शिर्के यांचे वंशज दीपक शिर्के यांनी राज्यभर आंदोलनाचा इशारा दिला आहे. दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर आणि छावा कादंबरीची जे प्रकाशक आहेत त्यांना इतिहासातील संदर्भ दाखवा अशी नोटीस दिली आहे. चित्रपट दाखवायच्या आधी यांनी आमच्याशी चर्चा करायला हवी होती की यावर तुमचं मत काय आहे ,आमचा सल्ला घेतला गेला नाही, असंही दीपक शिर्के यांनी म्हटलंय. दिग्दर्शक उतेकर यांनी उत्तर द्यावं अन्यथा महाराष्ट्रात त्यांना फिरू देणार नाही, त्यांनी चूक केली आहे, असं दीपक शिर्के यांनी म्हटलंय.या चित्रपटात इतिहासाची तोडमोड केली आहे. जाणीवपूर्वक इतिहास बदलला आहे .आमच्या घराण्याला बदनाम केलं जात आहे .आमच्या घराण्याविरोधात हे षडयंत्र आहे, आमची करत बदनामी केली जात आहे.चुकीचा इतिहास दाखवला गेला असून आमच्या राजे शिर्के घराण्याला टार्गेट केलं गेल आहे .त्यांच्याकडं कुठलाही पुरावा नाही .छावा कादंबरी ज्यांनी लिहिली त्यांची देखील भेट आम्ही घेतली होती .राजे शिर्के घराण्याच खूप मोठ योगदान आहे .आम्ही गद्दारी केली असे कुठलेही पुरावे उपलब्ध नाहीत मग हे आरोप कसे केले जातात इतिहास गायब केला जात आहे .समजात तेढ निर्माण केली जात आहे , असंही त्यांनी म्हटलंतर आम्ही छावा चित्रपटाच्या विरोधात नक्कीच नाही,मात्र खलनायक चुकीचा दाखवला आहे. गणोजी राजे शिर्के यांनी वाट दाखवली नाही.



लक्ष्मण उतेकर यांनी चुकीचा इतिहास दाखवला आहे.सिनेमॅटिक लिबर्टीच्या नावाखाली चुकीचा इतिहास दाखवला गेला, असा थेट आरोप शिर्के घराण्याच्या वंशजांनी छावा चित्रपटाच्या दिग्दर्शकांवर केल्यानं नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. छावा कादंबरीचे प्रकाशक आणि चित्रपटचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांच्यावर गुन्हा दाखल करणार असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# दिल्लीत मराठी साहित्य संमेलनाचा दैदीप्यमान सोहळा, मोदींच्या हस्ते उद्घाटन, काश्मीर कन्येकडून जय जय महाराष्ट्रचा जयघोष!...

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं उद्घाटन आज पार पडलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संमेलनाचं उद्घाटन झालं. ज्येष्ठ नेते शरद पवार, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित संमेलनाचा भव्य उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. शरद पवार हे साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष आहेत. त्यामुळे दिग्गजांच्या उपस्थितीत संमेलनाचा उद्घाटनाचा भव्यदिव्य कार्यक्रम पार पडला. यावेळी स्वागत गीत गाण्यात आलं. यानंतर काश्मीर कन्या शमीमा अख्तर या तरुणीने जय जय महाराष्ट्र माझा हे महाराष्ट्रगीत गात प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केलं. शमीमा हिच्या अंभगाचे व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले आहेत. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे यांनी स्वागतपर प्रास्ताविक भाषण केलं. या कार्यक्रमात शरद पवार यांनी आपल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबतचा एक किस्सा सांगितला. नरेंद्र मोदी यांना संमेलनाचं निमंत्रण देण्यासाठी आपण गेलो तेव्हा त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता आपण कार्यक्रमाला हजेरी लावणार असल्याचं आश्वासन दिलं, असं शरद पवार यांनी सांगितलं.मराठी सारस्वतांची दिंडी आज दिल्लीला आहे. याचा मला मनापासून आनंद आहे. केवळ महाराष्ट्र नाही तर मराठी माणसाने अटकेपार झेंडा फडकवला आहे. नोकरी कामाच्या निमित्ताने अनेक लोक देशाच्या कानाकोपऱ्यात दिसतात. मराठी साहित्याचा अद्भुत अनुभव घेण्यासाठी आपण इथे जमलो याचा मला मनापासून आनंद आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन देशाच्या राजधानीत दुसऱ्यांदा होत आहे. या सारस्वतांच्या महामेळाव्याला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हजर राहिले याचा मला मनापासून आनंद आहे, अशी भावना शरद पवार यांनी व्यक्त केली.आजचे साहित्य संमेलन मराठी भाषिकांच्या दृष्टीने आनंददायी घटनेच्या पार्श्वभूमीवर संपन्न होत आहे. महाराष्ट्राचे शासन, महाराष्ट्राचे साहित्यक, रसिक, या सगळ्यांनी एका गोष्टीचा पाठपुरावा केला, ती गोष्ट म्हणजे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा. हा दर्जा देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जी भूमिका बजावली त्याबद्दल समस्त मराठी भाषिकांच्यावतीने कृतज्ञता व्यक्त करतो, असं शरद पवार म्हणाले.




१९५४ साली पहिल्यांदा दिल्लीला मराठी साहित्य संमेलन झालं. त्यावेळी देशाचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांनी संमेलनाचे उद्घाटन केलं होतं. ते संमेलन यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते, स्वातंत्र्य सैनिक आणि केंद्र सरकारचे प्रतिनिधी काकासाहेब गाडगीळ यांचं फार मोठं योगदान होतं. यानंतर ७० वर्षांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दिल्लीत संमेलनाचे उद्घाटन होत आहे याचा आनंद आहे, असं शरद पवार म्हणाले.मी ज्यावेळेला संमेलनाचं उद्घाटन देण्यासाठी गेलो तेव्हा त्यांनी अक्षरशः एक मिनिट सुद्धा लावला नाही. महाराष्ट्राचा सोहळा आहे, सारस्वतांचा हा सोहळा आहे, माझी उपस्थिती आहे, असं त्यांनी सांगितलं. चंद्रभागेच्या काठी आषाढी कार्तिकेला जसे लाखो भाविक भक्तीभावाने जमतात तसंच साहित्य संमेलनासाठी महाराष्ट्राचे हजारो साहित्यप्रेमी दरवर्षी येत असतात. हे साहित्य संमेलन तुमच्या माझ्या आयुष्याचे महत्वाचे भाग आहे, असंदेखील शरद पवार आपल्या भाषणात म्हणाले.

# शुभमन गिलच्या शतकानंतरही भारताचा रडतखडत विजय...



**वृत्तसंस्था/ दुबई**

भारतीय संघ बांगलादेशवर सहजपणे मोठा विजय साकारेल, असे वाटत होते. पण शुभमन गिलच्या दमदार खेळीनंतरही भारताला रडतखडत विजय साकारता आला. बांगलादेशला भारताने २२८ धावांवर रोखले होते. भारताने दमदार सुरुवात केली होती. त्यामुळे भारत यावेळी मोठा विजय साकारत आपला रन रेट वाढवेल, असे वाटत होते. पण भारताने विजयाचे २२९ धावांचे आव्हान पूर्ण करण्यासाठी ४७ षटके वाट पाहावी लागली आणि त्यांनी सहा विकेट्स राखत विजय साकारला. भारताने या विजयासह आता दोन गुणांची कमाई केली आहे. शुभमन गिलने यावेळी ९ चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर नाबाद १०२ धावांती खेळी साकारली.

# सोन्याच्या गिंन्या दाखवून फसवणूक केल्या प्रकरणी दोन आरोपी मुद्देमालासह अटक,!!

**जनसंचलन/जळगाव जा**

जिल्ह्यातील जळगाव जामोद व संग्रामपूर तालुक्यात नकली सोने, काळी हळद, पांढरे बिबे ,मांडूळ साप सचं बोलो सच तोलो कलदर,कोईन नगमनी भोपळे,व इतर वस्तूची कमी पैशात मिळत असल्याची दलाला कडून बतावणी करून बाहेर जिल्ह्यातील लोकांची फसवणूक करून मारहाण करत लाखो रुपये उकळल्याचा प्रकार कित्तेक वर्षापासून पासून परिसरात सुरू आहे,जळगाव जा संग्रामपूर तालुक्यात मोठे रॅकेट सक्रिय असून मोठ्या प्रमाणात दलाल सक्रिय असून यांच्या विरोधात आज पर्यंत कारवाई झाली नव्हती परंतु प्रकरणी जळगाव जा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला,घटना दिनाक १८/२/२०२५ रोजी जामोद चौकी चे हद्दीत दोघांना सोन्याच्या गींन्या कमी पैशात मिळत असल्याची ची बतावणी करून दोन लाख रुपयाची फसवणूक बुलडाणा जिल्ह्यातील



जळगाव जा तालुक्यातील ग्राम जामोद येथे घडली असून घटनेची नोंद दिनाक १९/२/२०२५ रोजी जळगाव जामोद पोलीस स्टेशन येथे फिर्याद घेण्यात आली घटना ,दिनाक १८/२/२०२५ रोजी जामोद येथील आरोपी भारत भोसले व इतर दोन आरोपींना नगदी दोन लाख रुपये व दोन मोबाईल या मुद्देलासह अटक करण्यात आली घटनेचा कर्तव्य दक्ष अधिकारी यांनी तत्काळ तपास करीत आरोपी जेरबंद केले जळगाव जा पोलीस स्टेशन चे ठाणेदार श्रीकांत नीचड यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नागेश मोहोळ करीत रॅकेट च भांडाफोड करण्यात आला तसेच जनतेने प्रलोभनाला व आमिषाला बळी पडू नका,आमिषाला बळी पडल्यास तत्काळ पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल करावी असे आवाहनठाणेदार श्रीकांत नीचड यांचे वतीने करण्यात आले,

# शासकीय पदाचा गैरवापर करून कोणत्याही परवानगी न घेता शासकीय एफ क्लास जमिनीवर अतिक्रमण!

जनसंचलन/ देऊळघाट

इमरान खान

मौजे देऊळघाट येथील काही शासकीय पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या फायद्या करिता शासकीय पदाच्या दुरुपयोग करून जमिनीवर अतिक्रमण केल्याची तक्रार जुनेद खान फाखरुल्लाह खान यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केली आहे, सदर तक्रार मध्ये नमूद केले आहे की मौजे देऊळघाट ला लागून दत्तपुर शेवारात गट क्र २ मध्ये विकत घेतलेली जमिनीचे जे मालक आहे ते २ कर्मचारी तहसील कार्यालय बुलढाणा नावे श्री अशोक शेळके तलाठी साखळी ता. जिल्हा बुलढाणा व विनोद भास्करराव कोळसे तलाठी देऊळघाट ता.जि बुलढाणा मंडळ अधिकारी तसेच २ भूमिअभिलेख कार्यालय बुलढाणा यांचे नावे अतुल जगदाळे व नंदकिशोर माधवराव शेळके व इतर या सर्व अधिकाऱ्यांचे नावावर आहे .या अधिकाऱ्यांचे जमिनीला लागून मौजे देऊळघाट गट क्र २ ची जमीन विद्यमान जिल्हाधिकारी साहेब व तहसीलदार साहेब यांचा अधिकाराखाली आहे तसेच शासकीय नियमानुसार शासकीय कर्मचाऱ्यांना रु.२० हजार किंमतीच्या वर वस्तू विकत घ्यावयाच्या असल्यास त्यास त्याला त्यांचे अधिनस्त असलेल्या मा. जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असते. परंतू वरील



गैरअर्जदार यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन कोणत्याही प्रकारची सक्षम प्राधिकरणाची पूर्व परवानगी न घेता रु.११ करोड किंमतीची स्थावर मालमत्ता ही त्यांचे पदावर असलेल्या पदाचा दुरुपयोग व भ्रष्टाचार करुन कमाविलेली आहे असे तक्रार मध्ये नमूद केले आहे स्वतःच्या किंवा रक्तातील व जवळचे नातेवाईक यांचे नावावर बऱ्याच ठिकाणी वरील प्रमाणे चल-अचल संपत्ती जमा केलेली असावी अशी शक्यता आहे. इतकेच नव्हे तर वरील कर्मचाऱ्यांनी संघटीत गुन्हेगारी प्रमाणे एकत्रीत येवून आर्थिक व्यवहार केले असल्यामुळे व शासनाची जमीन हडप करीत असल्यामुळे त्यांचेविरुध्द संघटीत गुन्हेगारी कायद्यानुसार कारवाई होणे क्रमप्राप्त आहे. गैरअर्जदार हे याच जिल्ह्यात कार्यरत असून तलाठी कोळसे हे देऊळघाट येथे तलाठी या पदावर असल्याने व त्यांचे अखत्यारित शेतकऱ्यांच्या शेती असल्याने व तत्कालीन तहसिलदार श्री. रुपेश खंडारे व त्यांचे हाताखालील कर्मचारी यांनी संगनमताने कारवाई करुन व भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचारी यांना हाताशी धरुन संगनमताने जमीन हडपण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचबरोबर वरील गैरअर्जदार हे कार्यालयीन कर्मचारी असल्याने उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयातील अभिलेखामध्ये खोडतोड किंवा अभिलेख गहाळ करण्याची शक्यता नाकारता येत नाही. गैरअर्जदार यांनी त्यांच्या पदावर काम करीत असतांना अनेक वेळा अनियमितता करुन व खोटी नाटी कागदपत्रांवरुन अनेक लोकांकडून पैशाची मागणी केलेली आहे व पैसे उकळण्याकरिता अनेक प्रकारचे बहाणे करुन भ्रष्टाचार करीत आहेत. या कर्मचाऱ्यांची नोकरीपूर्वीचे व आताचे उत्पन्नाचा हिशोब केल्यास आपल्या लक्षात येईल की, त्यांनी नोकरीवर रुजू झाल्यापासून शासकीय पदाचा करिता वरील प्रकरणाची तात्काळ ७ दिवसाचे आत कार्यवाही करण्यात यावी. अन्यथा लोकशाही मार्गाने जनहित आंदोलन करण्यात येईल असा इशारा सुद्धा जुनेद खान फखरुल्लाह खान यांनी दिला आहे.

# नगरपरिषद कार्यालयातील दिव्यांग कार्यालय खालच्या मजल्यावर हलविण्याची मागणी

जनसंचलन/ नांदुरा

शहरातील नगरपरिषद कार्यालयात दिव्यांगांसाठी असलेले कार्यालय वरच्या मजल्यावर आहे. त्यामुळे दिव्यांग व्यक्तींना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यांच्या सोयीसाठी हे कार्यालय खालच्या मजल्यावर हलवावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. सध्या नगरपरिषदेत विविध कार्यालयीन कामांसाठी दिव्यांगांना वरच्या मजल्यावर जावे लागते. पायऱ्या चढणे कठीण असल्याने त्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. काही दिव्यांगांना इतरांच्या मदतीशिवाय कार्यालयात प्रवेश करता येत नाही. त्यामुळे दिव्यांगांचे कार्यालय तळमजल्यावर हलवण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते अमोल अरुण करुटले यांनी नगरपरिषद



मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे. त्यांनी निवेदनात नमूद केले की, ङ्खदिव्यांग व्यक्तींसाठी सुलभ आणि सोयीस्कर अशी व्यवस्था व्हावी, यासाठी दिव्यांगांचे ऑफिस खालच्या मजल्यावर हलविणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांच्या दैनंदिन कार्यप्रक्रियेत सुलभता येईल आणि ते अधिक सहजतेने काम करू शकतील.दिव्यांगांसाठी हे पाऊल सकारात्मक ठरेल, असे मत अनेक नागरिकांनी व्यक्त केले आहे. नगरपरिषदेने तातडीने या मागणीची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा आहे.

# २४ वर्षीय तरुणांची गळफास घेऊन आत्महत्या!

जनसंचलन/देऊळघाट

इमरान खान

बुलढाणा तालुक्यातील देऊळघाट येथील २४ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे सागर गजानन कांबळे वय २४ रा. देऊळघाट असे आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव आहे या तरुणांनी आज दि २१ फेब्रुवारी वार शुक्रवारी ३.३० वाजेच्या सुमारास बौद्ध वाडा तांदुळवाडी रोड देऊळघाट या ठिकाणी स्वतःच्या घरी दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आत्महत्या का केली याचे कारण अद्याप कळू शकले नाही.



ज्यावेळेस आत्महत्या केली त्यावेळेस घरी कोणी नव्हते. घरातील सर्व मंडळी हे बाहेर कामाला गेले होते. बहिण ही घरी आली असता तिला हा सर्व प्रकार दिसून आला. वडील हे मिस्तरी काम करता त्याला एक बहीण आहे. त्याचा मृतदेह हा जिल्हा सामान्य रुग्णालयात पोस्टमार्टम साठी रेफर करण्यात आला.

# सहाय्यक आयुक्त गजानन घिरके शास्त्रीय गायन विषयात विशेष योग्यता श्रेणीत उत्तीर्ण...

जनसंचलन/बुलढाणा

सहाय्यक आयुक्त गजानन घिरके शास्त्रीय गायन विषयात विशेष योग्यता श्रेणीत उत्तीर्ण अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ,मुंबई अंतर्गत घेण्यात आलेल्या नोव्हेंबर डिसेंबर २०२४ या सत्रातील गायन वादन व नृत्य या विषयांचा निकाल नुकताच घोषित झाला असून यामध्ये स्वरविहार संगीत विद्यालयाचे विद्यार्थी अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त गजानन गिरके हे शास्त्रीय गायन विषयात प्रारंभिक परीक्षेत विशेष योग्यता श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.सहाय्यक आयुक्त घिरके हे बुलढाण्यातील नामांकित असलेल्या महात्मा फुले शिक्षण संस्थेचे सदस्य असून सामाजिक क्षेत्रामध्ये त्यांचे मोठे योगदान आहे. त्याचबरोबर इगतपुरी येथील विपश्यना केंद्राचे उपकेंद्र असलेल्या पांगरी येथील विपश्यना केंद्राचे ते ट्रस्टी आहेत.स्वरविहार संगीत विद्यालयांमध्ये घिरके हे नियमित गायन व वादनाचे धडे घेत असतात. त्यांच्या या यशाबद्दल अन्न व औषध प्रशासन विभाग तसेच संगीत क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.या परीक्षेसाठी त्यांना स्वरविहार संगीत विद्यालयाचे संचालक प्रा.रविकिरण मोरे यांनी मार्गदर्शन केले आहे.



# उपमुख्यमंत्री शिंदेंना बॉम्बने उडविणार...

## धमकी देणारे बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव माहिचे!

## आ. श्वेता महाले यांनाही जीवे मारण्याच्या धमकीचे पत्र!

**जनसंचलन/बुलढाणा**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शासकीय वाहन बॉम्बने उडवून दिले जाईल, अशी धमकी गुरुवारी शहरातील काही पोलीस ठाणे आणि मंत्रालयाला ई-मेलद्वारे प्राप्त झाली.याप्रकरणी गुन्हे शाखेने दोन तरूणांना ताब्यात घेतले आहे दोघेही बुलढाणा जिल्ह्यातील रहिवासी आहे. त्यांना मुंबई आणण्यात येत आहे.दरम्यान चिखलीच्या भाजपा आ. श्वेता महाले यांनाही जीवे मारण्याच्या धमकीचे पत्र मिळाल्याची माहिती आहे. शिवसेनेचे पक्ष प्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ठार मारण्याची धमकी काल देण्यात आली. एकनाथ शिंदे यांची गाडी बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. गोरेगाव पोलीस ठाण्यात हा धमकीचा ई-मेल आला आहे. पोलिसांनी ई-मेल पाठणाऱ्यांचा शोध सुरू केला. मुंबईतील इतर पोलीस ठाण्यांमध्येही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याच्या धमकीचा मेल आला होता. ई-मेलमध्ये एकनाथ शिंदे यांची मोटार बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली होती. गोरेगाव पोलीस ठाण्याला शिंदे यांचे शासकीय वाहन उडवून देण्याबाबत धमकीचा ई-मेल प्राप्त झाला होता. याप्रकरणी गोरेगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३५१(३), ३५१(४) व ३५३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी गुन्हे शाखेने तपास करून मंगेश




अच्युतराव वायळ (३५) व अभय गजानन शिंगणे (२२) यांना ताब्यात घेतले असून दोघेही बुलढाणा जिल्ह्यातील देऊगाव येथील रहिवासी आहेत. त्यांना मुंबईत आणण्यात येत आहे. धमकीचा ई-मेल आल्यानंतर अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# आजोबा गेले..नातू वाचला!

## दुचाकींच्या अपघात वाढ!

### वाहतूक पोलीस यंत्रणेचे दुर्लक्ष?




**जनसंचलन/ चिखली**

मौजे मालगाणी येथे दोन दुचाकीच्या भीषण अपघातात एकाचा मृत्यू झाला असून, एकजण किरकोळ जखमी झाला आहे. ही दुर्दैवी घटना आज शुक्रवार सकाळी १० वाजे दरम्यान घडली.दरम्यान अपघाताचे प्रमाण वाढले असून, वाहतूक पोलिसांची दुर्लक्ष दिसून येत आहे. माहितीनुसार, मृतक मोहम्मद अशपाक अब्दुल रज्जाक हे आपल्या नातवासोबत मालगाणीहून चिखलीकडे येत असताना, चिखली ते बुलढाणा जाणाऱ्या एका भरधाव दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत मोहम्मद अशपाक यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा नातू मोहम्मद साद हा किरकोळ जखमी झाला असून, त्याला फक्त खरचटले आहे.अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली व जखमीला तातडीने वैद्यकीय उपचारांसाठी हलवले. दरम्यान, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. वाहनचालकांनी सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करावे, वेगावर नियंत्रण ठेवावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.परंतु वाहतूक पोलिसांनी असे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# भालगाव येथील लोकुत्तर महाविहारचा भूमीपूजन सोहळा

**जनसंचलन/ चिखली**

चिखली तालुक्यातील भालगाव येथील बुध्द रूपाचा प्रथम वर्धापन दिन साजरा होणार आहे. तसेच २२ , २३ फेब्रुवारीला धम्मपरिषद आयोजीत केली आहे. सकाळपासून धम्माचे विविध कार्यक्रम होणार आहे. या लोकुत्तरा बुध्द विहाराच्या विविध विकास कामाचे भूमीपूजन २२ फेब्रुवारी शनिवारला संध्याकाळी चार वाजता चिखली मतदार संघाच्या लोकप्रिय, विकासमुर्ती लाडक्या आमदार श्वताताई महाले पाटील यांच्या शुभहस्ते होणार असून या भूमीपूजन सोहळ्याचे मुख्यपाहूने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव मा. विद्याधरजी महाले पाटील राहणार आहे.

२२,२३ फेब्रुवार रोज शनिवार रविवार दोन दिवस सकाळपासून बुध्दधमाच्या विधी प्रमाणे कार्यक्रम महापरित्राणपाठ, भिक्खुसंघाची धम्मदेशना व दान कार्यक्रम आयोजीत करण्यात आला आहे. या धम्मपरिषदेचे व कार्यक्रमाचे अध्यक्ष अखीलभारतीय भिक्खुसंघाचे अनुसंघनायक बोध्दीपालो महाथेरो असून धम्मसेना अखील भारतीय भिक्खुसंघाचे महासचिव भदंत सुमनवन्नो महाथेरो चंद्रपूर यांची धम्मदेशना होणार आहे.

तरी या धम्मपरिषदेला व विकास कामच्या भूमीपूजन सोहळ्यासाठी श्रध्दावान उपासक, उपासिकानी या ऐतिहासीक कार्यक्रमास मोठ्यासंख्ख्येने तसेच श्रध्दायुक्त चित्ताने दान देवुन वेळ देऊन आपल्या कुशलकम्मचे संचय करून आपल्या पारमी वृध्दांगत कराव्यात असे आवाहन भिक्खु बी राहूला आणि भिक्खु संघाकडून करण्यात येत आहे.

# पोफळी येथे श्रीं चा प्रकट दिन उत्साहात साजरा...

**वृत्तसंस्था/ मोताळा**

येथून जवळच असलेल्या पोफळी येथे दरवर्षी प्रमाणे या वर्षीसुद्धा श्री संत गजानन महाराज यांचा प्रकट दिन साजरा करण्यात आला.

सुरुवातीला सकाळी ९ वाजता बस स्थानक येथील मंदिरापासून गण गण गणात बोते च्या जय घोषात टाळ मृदूंगाचे निनादात दिंडी ला सुरुवात करण्यात आली. यावेळी महिलांनी आप आपल्या घरासमोर सडा सारवन करुन रांगोळ्या काढल्या होत्या. सदर दिंडी मधे महिलांनी फुगड्या खेळून सहभाग नोंदवला. दिंडी मंदिरात आल्यानंतर ११ वाजता सामूहिक आरतीला सुरुवात झाली. त्यानंतर पंचक्रोशीतील अनेक भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला



दरम्यान पोफळी, धोनखेड व परिसरातील भजन मंडळींनी श्रीं ची अनेक भजन म्हणत सर्व भाविक भक्तांना मंत्रमुग्ध केली. सदर कार्यक्रम योग्य रित्या पारपाडण्यासाठी पोफळी तसेच आजबाजूच्या सेवेकऱ्यांनी यावेळी सहभाग नोंदवला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958